**किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हंगाम २००८-०९ ते २०११-१२ मधील खरेदी करण्यात आलेले धान, सीएमआर व भरडधान्य वाहतूकीचे दर अंतिम करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.न्यायाप्र ३०२६/प्र.क्र.२२२/ना.पु.-२९**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २३ जून, २०२६.

वाचा -

१. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे पत्र क्र.संकीर्ण-१८०७/प्र.क्र.३९५२/ना.पु.२९, दि.१८.१०.२००८
२. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र.न्यायाप्र-१८१३/ ५३१/ प्र.क्र.८८/ ना.पु.२९, दि.१०.०५.२०१६
३. मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे दिनांक २७.०४.२०१६ चे अंतरिम आदेश

**प्रस्तावना:-**

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत पणन हंगाम २००८-०९ ते २०११-१२ या कालावधीत केलेल्या धान खरेदीसाठीच्या वाहतूक दरांबाबत दिनांक १० मे, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार पणन हंगाम २००८-०९ ते २०११-१२ या कालावधीकरीता गिरणीधारकांना वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाकडून देयके अदा करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत योजने अंतर्गत पणन हंगाम २००८-०९ ते २०११-१२ या कालावधीसाठी किमान आधारभूत किंमत योजनेतंर्गत करण्यात आलेल्या वाहतूकीचे दर अंतिम करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

## शासन निर्णय:-

प्रस्तुत शासन निर्णयान्वये पणन हंगाम २००८-०९ ते २०११-१२ या कालावधीत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धानाच्या वाहतूकीसाठी पणन हंगाम २००७-०८ प्रमाणे पुढीलप्रमाणे दर अंतिम करण्यात येत आहेत.

| अ.क्र | वाहतूकीचे अंतर | अंतिम केलेले वाहतूक दर |
|---|---|---|
| १ | ० ते५ कि.मी. | रु.५ प्रति संपुर्ण अंतराकरीता |
| २ | ५ ते१० कि.मी. | रु.१ प्रति क्विंटल प्रति किं.मी |
| ३ | १० ते २० कि.मी. | ७० पैसे क्विंटल प्रति किं.मी |
| ४ | २० ते ४० कि.मी. | ६० पैसे प्रति क्विंटल प्रति किं.मी |
| ५ | ४० ते ६० कि.मी | ५० पैसे प्रति क्विंटल प्रति किं.मी |

३. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०६२३१३००२६०९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.06.23 13:01:16 +05'30'

**(प्रमोद पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव.
४. मा.मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
५. मा.मंत्री, पणन यांचे खाजगी सचिव.
६. मा.मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव.
७. मा.विरोधी पक्ष नेते (विधानसभा, विधानपरिषद)
८. मा.सर्व मंत्री, यांचे खाजगी सचिव.
९. सर्व विधानपरिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१६. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
१७. सर्व विभागीय आयुक्त.
१८. सर्व जिल्हाधिकारी.
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई.
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक.
२१. नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा(गो/वा),मुंबई.
२२. सर्व उप आयुक्त (पुरवठा).
२३. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
२४. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
२५. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२६. उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
२७. सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी, अनापु व ग्रासंवि, मंत्रालय, मुंबई.

२८. सरव्यवस्थापक, भारतीय अन्न महामंडळ, बोरीवली, मुंबई.
२९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती).
३०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय ६ वा मजला, विधान भवन, मुंबई. (१०प्रती)
३१. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, (प्रत्येकी ५ प्रती)
३२. निवड नस्ती (नापु-२९).